क्र.महसूल/क-१/टे-१/एलबीपी/एसआर-०१/२०१२
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
दिनांक 24 JAN 2012

वाचले :-

१. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.नाजक २००८/प्र.क्र.२००/नाजकधा २, दिनांक २३/११/२०११
२. श्री.नितलेश भालेराव, मुख्य प्रवर्तक ओम साई विनायक (विधानमंडळ अधिकारी / कर्मचारी) सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) पत्ता:- कक्ष क्र.८०१, ८व्या मजला, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२ यांचा दिनांक १५/१२/२०११ रोजीचा अर्ज
३. तहसिलदार ठाणे यांचेकडील स्थानिक चौकशी अहवाल पत्र क्र.महसूल/क-१/टे-२/जमिनबाब/कावि-२०१४२/१५०/११, दिनांक ०२/०१/२०१२
४. अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी ठाणे नागरी संकुलन ठाणे यांचेकडील पत्र जा.क्र.युएलसी/टिए/एटीपी/ओम साई विनायक गृहनिर्माण संस्था/ताबा/२०११/२३५७, दिनांक १७/११/२०११
५. सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे (शहर) यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. स.जि.नि./ठाणे-शहर/मुल्यांकन/५२/२०१२, दिनांक ०३/०१/२०१२

---

आदेश :-

ज्या अर्थी उपोद्घातील अनुक्रमांक १च्या पत्रान्वये शासनाने मौजे भाईंदरपाडा तालुका व जिल्हा ठाणे येथील जुना स.क्र.१९७/२६पैकी नवीन १००/२६ब, क्षेत्र १६८६-१५चौ.मी. क्षेत्र ओम साई विनायक (विधानमंडळ अधिकारी / कर्मचारी) सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) या संस्थेस सन २०११च्या शिघ्रसिध्द गणकानुसार किंमत आकारुन देण्यास शासनाने मान्यता दिल्याचे कळविले आहे.

आणि ज्या अर्थी मौजे भाईंदरपाडा तालुका व जिल्हा ठाणे येथील जुना सर्व्हे क्र.१९७/२६पैकी, नवीन १००/२६ब ची जमीन नागरी जमीन कमाल धारणा कायदयांतर्गत अतिरिक्त घोषित होवून महाराष्ट्र शासनाचे नांवे झालेली आहे. प्रकरणात दाखल फेरफार क्र.२३०, दिनांक ०१/०३/२००४ पाहता अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी ठाणे नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र.युएलसी/टी.ओ./एटीपी/ योजना कलम २०, दिनांक ११/०४/२००२ नुसार तालुका हुकूमाने सदर जमीन महाराष्ट्र शासनाचे नावे केली आहे. सदर फेरफारातील शेरा कॉलम पाहता दिनांक १४/०६/२००२ रोजीची ताबा पावती पाहिल्याची नोंद आहे.

आणि ज्या अर्थी सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे (शहर) यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.स.जि.नि./ठाणे-शहर/मुल्यांकन/५२/२०१२, दिनांक ०३/०१/२०१२ अन्वये मुल्यांकन रक्कम रुपये १,०१,१६,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एक लाख सोळा हजार नवुशे मात्र) होत असल्याचे कळविले असून सदरची रक्कम अर्जदार संस्थेने चलन क्र.१/२०१२, (भारतीय स्टेट बँककडील चलन क्र.००८५८/जे-१९५००२६५) दिनांक २१/०१/२०१२ अन्वये तहसिलदार ठाणे यांचे कार्यालयात भरणा केलेली आहे. तथापी सदरची रक्कम आकारणीबाबत भविष्यात काही फरक आढळून आल्यास येणा-या फरकाची रक्कम व्याजासह भरणे अर्जदार संस्थेवर बंधनकारक राहील.

त्या अर्थी मी जिल्हाधिकारी ठाणे उपोद्घातातील अनुक्रमांक १ वरील पत्रान्वये नगर विकास विभागाने कळविलेल्या शासन आदेशानुसार मला असलेल्या अधिकारांचा वापर करुन मौजे भाईंदरपाडा तालुका व जिल्हा ठाणे येथील जुना स.क्र.१९७/२६पैकी नवीन १००/२६ब, क्षेत्र १६८६-१५चौ.मी. ओम साई विनायक (विधानमंडळ अधिकारी / कर्मचारी) सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांचे नांवे दाखल करण्याचे आदेश देत आहे.

सही/-
(ए. एल. ज-हाड)
जिल्हाधिकारी, ठाणे

प्रति,
श्री.नितलेश भालेराव, मुख्य प्रवर्तक ओम साई विनायक (विधानमंडळ अधिकारी / कर्मचारी) सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) पत्ता:- कक्ष क्र.८०१, ८व्या मजला, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
प्रत :- तहसिलदार ठाणे

२/- अर्जदार यांना सदरच्या जागेचा ताबा शासनाच्या प्रचलित धोरणानुसार देण्यात येवून ताबा पावतीसह अहवाल सादर करावा.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

.- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी रवाना.

प्रत :- मा.अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी रवाना

प्रत :- कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना त्यांचेकडील उपोद्घातील अनुक्रमांक ३ च्या पत्रान्वये माहितीसाठी रवाना.

प्रत :- कार्यालयीन संचिका

जिल्हाधिकारी ठाणे करिता

प्रतिलिपि
21/2012
प्र. डा बाळकृष्ण

क्र. महसुल/कक्ष-१/टे-१/एलबीपी ६९८
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
ठाणे दिनांक :- ६/०६/२०००.

वाचले -१) मे. विनयगा मरीन पेट्रो लि. मुंबई यांचा दिनांक ०६/०५/९९ चा अर्ज.
२) शासनाचे महसुल व वनविभागा कडील ज्ञापन क्रमांक जमिन २७९८/१९००/प्र.क्र.१४४५/ज-४/ दिनांक १०/०४/२०००.
३) शासनाचे महसुल व वनविभागाकडील ज्ञापन क्रमांक जमिन २७९८/१९००/प्र.क्र. १४४५/ज-४/ दिनांक ०८/०५/२०००.

आदेश

ज्या अर्थी मे. विनयगा मरीन पेट्रो लि. मुंबई या कंपनीने मौजे ओवळा गायमुख ता. ठाणे येथिल स.नं. २८६,२८९,२९६,२९७ लगतची खाडीपैकी सर्वे नंबर नसलेली १० एकर ३१ गुंठे शासकीय जमिनीची मागणी प्रस्तावनेतील अ.क्र. १ वरील अर्जान्वये औद्योगिक प्रयोजनासाठी मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

आणि ज्या अर्थी प्रस्तावनेतील अ.क्र. ३ वरील ज्ञापनान्वये शासनाने सदर जागा मे. विनयगा मरीन पेट्रो लि. मुंबई यांना औद्योगिक प्रयोजनासाठी देणे बाबत मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्या अर्थी मे. विनयगा मरीन पेट्रो लि. मुंबई कंपनी यांनी कब्जा हक्काची रक्कम रुपये ३१,०७,६९८/- (अक्षरी र.रु. एकतीस लक्ष सातहजार सहाशे अठ्ठयाण्णव मात्र) तसेच २,२८,९२६/- (अक्षरी र.रु. दोन लाख अठ्ठावीस हजार नऊशे सव्वीस मात्र) असे एकुण रक्कम रुपये ३३,३६,६२४/- (अक्षरी र.रु.तेहत्तीस लाख छत्तीस हजार सहाशे चौवीस मात्र) जमा केली आहे.

त्या अर्थी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ३१ व तद् अनुषंगाने महाराष्ट्र जमिन महसुल ( सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे ) नियम १९७१ चे नियम ३१ अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडे निहीत असलेल्या अधिकाराचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी मौजे ओवळा गायमुख ता. ठाणे येथिल स.नं. २८६,२८९,२९६,२९७, लगतची खाडी पैकी स.नं. नसलेली १० एकर ३१ गुंठे ( ४३,६०४.९१ चौ.मि.) जमिन औद्योगिक प्रयोजनासाठी खालील अटी शर्तीवर कब्जेहक्काने मंजुर करीत आहे.

१) राज्य शासनाची पुर्व परवानगी असल्याशिवाय जमिनीची पोट विभागणी करण्यात येणार नाही, किंवा ती कोणत्याही प्रकारे निकालात काढण्यात येणार नाही.
२) जमिनीवरील बांधकामे आणि कोणताही कारखाना, संयंत्र व इतर संचमांडणी यांसह असेल त्याशिवाय, जमिनीची विल्हेवाट लावण्यात येणार नाही, आणि अशा रीतीने विल्हेवाट लावण्यात आलेली जमिन, राज्य शासनाची मान्यता असेल त्याशिवाय ती सुरुवातीस ज्या प्रयोजनाकरिता देण्यात आली असेल त्या प्रयोजनाखेरीज इतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणार नाही.
३) जमिनीवरील कारखाना, संयंत्र बांधकाम आणि इतर संचमांडणी यांसह जमिनीची विक्री करुन विल्हेवाट लावण्यात आल्यावर, राज्य शासनाचा अर्ध्या अनर्जित उत्पन्नावर हक्क असेल आणि अशी जमिन, उपरोक्त कोणत्याही बांधकामाशिवाय, विकण्यात आली असेल त्याबाबतीत, राज्य शासन ठरवील त्याप्रमाणे, ९० टक्क्यांपेक्षा अधिक नसलेल्या अनर्जित उत्पन्नावर राज्य शासनाचा हक्क असेल.
४) विक्रीच्या किमतीसंबंधात, कोणताही विपर्यास किंवा लपवाछपवी झाली आहे असे राज्य शासनास सकारण वाटले तर, राज्य शासनाच्या स्वेच्छा निर्णयानुसार विक्री अग्राह्य ठरवण्यायोग्य होईल.
५) कंपनीला मंजुर जमिनीचा वापर जहाज बांधणी व जहाज दुरुस्ती या कामाशिवाय अन्य कोणत्याही कामासाठी करता येणार नाही.
६) मंजुर जमिनीवर आपला नियोजीत उद्योग प्रत्यक्षात सुरु करण्यापुर्वी कंपनी सर्व संबंधीत [illegible] विभाग यंत्रणा यांची परवानगी घेईल.
७) जमिनीवर सध्या अस्तित्वात असलेल्या बांधकामाचे नुतनीकरण करावयाचे असल्यास तसेच [illegible] [illegible]

८) कंपनीला मंजुर केलेल्या जमिनीच्या वापरा संदर्भात कंपनीकडुन सीआरझेड तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

९) राज्य शासनाला योग्य वाटेल अशा वेळी, कंपनीला कब्जेदाराने दिलेल्या जमिनीवर प्रवेश करण्याचा व संपुर्ण जमिनीचा अथवा तिच्या भागाची व त्यावर कंपनीकडुन करण्यात येत असलेल्या व्यवसायाची तपासणी करण्याच जिल्हाधिकारी ठाणे यांना अथवा त्यांनी त्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याला अधिकार असतील.

१०) महाराष्ट्र जमिन महसुल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे ) नियम १९७१ चे नियम ४२(१) (ब) नुसार नमुंना १३ मध्ये करार पत्र करुन देणे अनुज्ञाप्राप्ती यांचेवर बंधकारक राहील.

(मुकेश खुल्लर)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रति,
मे. विनयगा मरीन पेट्रो लि. कंपनी, मुंबई.

प्रत :- मा. आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन वाशी, नवी मुंबई.
प्रत :- कार्यासन अधिकारी महसुल व वन विभाग, ज-४ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
प्रत :- तहसिलदार ठाणे यांचेकडे माहितीसाठी पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२/- विषयांकित जागेची तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांचेकडुन मोजणी करुन घेऊन जागेचा ताबा मे. विनयगा मरीन पेट्रो लि. कंपनी, मुंबई यांना दयावा. तसेच सदरची जागा खाडीपैकी असल्याने याजागेला स.नं. नाही. त्यामुळे सदर जागेची तालुका निरीक्षक भुमि अभिलेख ठाणे यांचेकडुन मोजणी करुन घेऊन नव्याने भुमापन क्रमांक देण्याची कार्यवाही करुन त्याप्रमाणे गावचे अधिकार अभिलेख तयार करुन जागेच्या ताबे पावतीसह पुर्तता अहवाल सत्वर सादर करावा.
प्रत :- तालुका निरीक्षक भुमी अभिलेख ठाणे यांच्याकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्याकार्यवाहीसाठी रवाना.
२/- सदरची जागा ही खाडीपैकी असल्याने या जागेला स.नं. दिलेला नाही. त्यामुळे सदरची जागेची मोजणी करुन घेऊन नव्याने भुमापन क्रमांक देण्याची कार्यवाही करावी.
प्रत :- तलाठी सजा ओवळा
प्रत :- हायड्रोग्राफर महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड इंडियन मर्कंटाईल चेंबर्स, ३ रा माळा, रामजीभाई कमानी मार्ग बॅलार्ड, इस्टेट, मुंबई - ४०० ०३८.

जिल्हाधिकारी ठाणे करितां.

सही तपासर मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचा सही मध्ये

जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
जिल्हा ठाणे.